# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

## कपिल गीता अध्याय(3.27)



**वर्णन करने सांख्य योग का, और देने को ज्ञान ।**
**गुरु रूप में कपिल मुनि थे, देवहूति शिष्य समान।**

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**तृतीय स्कंधः**

**॥अथ सप्तविं(म्)शोऽध्यायः ॥**

**श्रीभगवानुवाच**

**प्रकृतिस्थोऽपि पुरुषो, नाज्यते प्राकृतैर्गुणैः ।**
**अविकारादकर्तृत्वान्- निर्गुणत्वाज्जलार्कवत् ॥ 1॥**

**श्री भगवान म्हणाले -**

ज्याप्रमाणे पाण्यात प्रतिबिंबित झालेल्या सूर्याचा पाण्याची शीतलता ,चंचलता आदी गुणांशी संबंध येत नाही ,त्याचप्रमाणे प्रकृतीचे कार्य असणाऱ्या शरीरात राहूनही आत्महत्याच्या सुखदुःखाची धर्मांनी लिप्त होत नाही .कारण तो निर्विकार ,आकरता आणि निर्गुण आहे .

**स एष यर्हि प्रकृतेर्-गुणेष्वभिविषज्जते ।**

अहङ्क्रियाविमूढात्मा, कर्तास्मीत्यभिमन्यते ॥ 2॥

परंतु जेव्हा तो प्रकृतीच्या गुणांशी आपला संबंध जोडतो ,तेव्हा अहंकाराने मोहित होऊन 'मी कर्ता 'असे मानू लागतो .

तेन सं(म्)सारपदवी-मवशोऽभ्येत्यनिर्वृतः ।

प्रासङ्गिकैः(ख्) कर्मदोषैः(स्), सदसन्मिश्रयोनिषु ॥ 3॥

त्यामुळे तो देहाच्या संबंधाने केलेल्या पुण्य पाप रूप कर्मांच्या दोषांमुळे आपले स्वातंत्र्य आणि शांती गमावून बसतो आणि उत्तम ,मध्यम आणि नीच योनींमध्ये जन्म घेऊन संसार चक्रात फिरत राहतो .

अर्थे ह्यविद्यमानेऽपि, सं(म्)सृतिर्न निवर्तते ।

ध्यायतो विषयानस्य, स्वप्नेऽनर्थागमो यथा ॥ 4॥

ज्याप्रमाणे स्वप्नातील भयशोकाचे काहीही कारण नसताना सुद्धा स्वप्नातील पदार्थांशी संबंध जोडल्यामुळे सुखदुःख भोगावे लागते ,त्याचप्रमाणे संसाराचे अस्तित्व नसून सुद्धा अज्ञानाने विषयांचे चिंतन करीत राहिल्याने जीवाची संसार चक्रातून कधी सुटका होत नाही .

अत एव शनैश्चित्तं(म्), प्रसक्तमसतां(म्) पथि ।

भक्तियोगेन तीव्रेण, विरक्त्या च नयेद्वशम् ॥ 5॥

म्हणूनच मनुष्याने विषय चिंतनाच्या  मार्गात गुंतलेल्या चित्ताला तीव्र भक्ती योग आणि वैराग्य यांच्या योगाने हळूहळू आपल्या स्वाधीन करून घ्यावे .

यमादिभिर्योगपथै-रभ्यसन् श्रद्धयान्वितः ।

मयि भावेन सत्येन, मत्कथाश्रवणेन च ॥ 6॥

सर्वभूतसमत्वेन, निर्वैरेणाप्रसङ्गतः ।

ब्रह्मचर्येण मौनेन, स्वधर्मेण बलीयसा ॥ 7॥

यदृच्छयोपलब्धेन, सन्तुष्टो मितभुङ्मुनिः ।

विविक्तशरणः(श्) शान्तो, मैत्रः(ख्) करुण आत्मवान् ॥ 8॥

सानुबन्धे च देहेऽस्मिन्- नकुर्वन्नसदाग्रहम् ।

ज्ञानेन दृष्टतत्त्वेन, प्रकृतेः(फ्) पुरुषस्य च ॥ 9॥

निवृत्तबुद्ध्यवस्थानो, दूरीभूतान्यदर्शनः ।

उपलभ्यात्मनाऽऽत्मानं(ञ्), चक्षुषेवार्कमात्मदृक् ॥ 10॥

मुक्तलिङ्गं(म्) सदाभास-मसति प्रतिपद्यते ।

सतो बन्धुमसच्चक्षुः(स्), सर्वानुस्यूतमद्वयम् ॥ 11॥

यमा इत्यादी योगसाधनांच्या द्वारा श्रद्धापूर्वक चित्ताला वारंवार एकाग्र करीत माझ्यामध्ये खरीखुरी भक्ती ठेवणे ,कोणाशी वैर न करणे ,आ सक्तीचा त्याग करणे ,ब्रह्मचर्य ,मौनव्रत आणि निष्ठेने केलेल्या स्वरधर्माचरणाने ,प्रारब्धानुसार जे काही मिळते त्यात संतुष्ट राहण्याने 'शरीररक्षणाला आवश्यक तितकेच भोजन करण्याने ,नेहमी एकांतात राहण्याने ,शांत स्वभावाने ,कसा सर्वांचा मित्र म्हणून दयाळू व धैर्यवान राहण्याने ,प्रकृती आणि पुरुषाच्या वास्तविक स्वरूपाच्या अनुभवाने प्राप्त झालेल्या तत्त्वज्ञानामुळे स्त्रीपुत्रादी संबंधितांसह या देहाबद्दल मी माझे असा खोटा अभिमान धारण न करण्याने ,बुद्धीच्या जागृती इत्यादी अवस्थांपासून अलिप्त राहण्याने ,तसेच परमात्म्याशिवाय दुसरी कोणतीच वस्तू न पाहण्याने ,आत्मदर्शी मुनी डोळ्यांनी सूर्य पहावा तसा आपल्या शुद्ध अंतकरणाने परमात्म्याचा साक्षात्कार करून घेतो आणि जे देहादी उपाधींपासून वेगळे ,अहंकारा दी ,खोट्या गोष्टींमध्ये सत्यरूपाने भासणारे जगाचे कारण असलेल्या प्रकृतीचे अधिष्ठान ,महदादी कार्य वर्गाचे प्रकाशक आणि कार्यकारण रूप संपूर्ण पदार्थांमध्ये व्यापलेले आहे .त्या अद्वितीय ब्रह्म पदाला प्राप्त होतो .

**यथा जलस्थ आभासः(स्), स्थलस्थेनावदृश्यते ।**

**स्वाभासेन तथा सूर्यो, जलस्थेन दिवि स्थितः ॥ 12॥**

**एवं(न्) त्रिवृदहङ्कारो, भूतेन्द्रियमनोमयैः ।**

**स्वाभासैर्लक्षितोऽनेन, सदाभासेन सत्यदृक् ॥ 13॥**

**भूतसूक्ष्मेन्द्रियमनो-बुद्ध्यादिष्विह निद्रया ।**

**लीनेष्वसति यस्तत्र, विनिद्रो निरहङ्क्रियः ॥ 14॥**

ज्याप्रमाणे पाण्यात पडलेले सूर्याचे प्रतिबिंब भिंतीवर पडलेल्या कवडशामुळे पाहिले जाते आणि पाण्यात पडलेल्या प्रतिबिंबामुळे आकाशातील सूर्याचे ज्ञान होते ,त्याप्रमाणे वैकारिक आदीभेदांमुळे तीन प्रकारचा अहंकार ,देह ,इंद्रिय आणि मन यांत असलेल्या आपल्या प्रतिबिंबामुळे जाणला जातो आणि पुन्हा परमात्म्याच्या प्रतिबिंबामुळे त्या अहंकाराच्या द्वारा सत्यज्ञान स्वरूप त्या परमात्म्याचे दर्शन होते .जो गाढ झोपेत शब्दा दी सूक्ष्म भुते ,इंद्रिये ,मन बुध्दी इत्यादी प्रकृतीत लीन झालेल्या वेळी स्वतः जागा राहतो आणि सर्वथा अहंकार शून्य असतो .

**मन्यमानस्तदाऽऽत्मान-मनष्टो नष्टवन्मृषा ।**

**नष्टेऽहङ्करणे द्रष्टा, नष्टवित्त इवातुरः ॥ 15॥**

ज्याप्रमाणे धनाचा नाश झाल्यानंतर मनुष्य आपणच नष्ट झालो असे मानून अत्यंत व्याकूळ होतो ,त्याचप्रमाणे हा द्रष्टा आत्मा सुद्धा सुशु प्ती अवस्थेत आपल्या उपाधी भूत अहंकाराचा नाश झाल्याकारणाने भ्रमाने आपणच नष्ट झालो ,असे समजतो .

**एवं(म्) प्रत्यवमृश्यासा- वात्मानं(म्) प्रतिपद्यते ।**

**साहङ्कारस्य द्रव्यस्य, योऽवस्थानमनुग्रहः ॥ 16॥**

या सर्व गोष्टींचे मन न करून विवेकी पुरुष जो अहंकारासहित सर्व तत्वांचे अधिष्ठान आणि प्रकाशक आहे ,त्या आपल्या आत्म्याचा अनुभव घेतो .

## देवहूतिरुवाच

**पुरुषं(म्) प्रकृतिर्ब्रह्मन्, न विमुञ्चति कर्हिचित् ।**

**अन्योन्यापाश्रयत्वाच्च, नित्यत्वादनयोः(फ्) प्रभो ॥ 17॥**

देव हूतीने विचारले - प्रभो !पुरुष आणि प्रकृती दोन्हीही नित्य आणि एकमेकांच्या आश्रयाने राहणारी आहेत ,म्हणून प्रकृती तर पुरुषाला कधीच सोडू शकत नाही .

**यथा गन्धस्य भूमेश्च, न भावो व्यतिरेकतः ।**

**अपां(म्) रसस्य च यथा, तथा बुद्धेः(फ्) परस्य च ॥ 18॥**

जसे गंध आणि पृथ्वी ,रस आणि पाणी ही एकमेकांपासून वेगळी राहत नाहीत ,त्याचप्रमाणे पुरुष आणि प्रकृती सुद्धा एक दुसऱ्याला सोडून राहत नाहीत .

**अकर्तुः(ख्) कर्मबन्धोऽयं(म्), पुरुषस्य यदाश्रयः ।**

**गुणेषु सत्सु प्रकृतेः(ख्), कैवल्यं(न्) तेष्वतः(ख्) कथम् ॥ 19॥**

म्हणून जिच्या आश्रयाने अकर्त्या पुरुषाला हे कर्म बंधन प्राप्त झाले आहे ,त्या प्रकृतीचे गुण शिल्लक असताना पुरुषाला कैवल्य पद कसे प्राप्त होईल ?

**क्वचित्तत्त्वावमर्शेन, निवृत्तं(म्) भयमुल्बणम् ।**

**अनिवृत्तनिमित्तत्वात्-पुनः(फ्) प्रत्यवतिष्ठते ॥ 20॥**

जरी तत्त्वांचा विचार केल्याने एखादेवेळी हे संसार बंधनाचे तीव्रभय नाहीसे झाले ,तरी त्याला कारण असणाऱ्या प्रकृतीच्या गुणांचा नाश न झाल्याने ते भय पुन्हा उपस्थित होऊ शकते .

## श्रीभगवानुवाच

**अनिमित्तनिमित्तेन, स्वधर्मेणामलात्मना ।**

**तीव्रया मयि भक्त्या च, श्रुतसम्भृतया चिरम् ॥ 21॥**

**ज्ञानेन दृष्टतत्त्वेन, वैराग्येण बलीयसा ।**

**तपोयुक्तेन योगेन, तीव्रेणात्मसमाधिना ॥ 22॥**

**प्रकृतिः(फ्) पुरुषस्येह, दह्यमाना त्वहर्निशम् ।**

**तिरोभवित्री शनकै-रग्नेर्योनिरिवारणिः ॥ 23॥**

श्री भगवान म्हणाले -ज्याप्रमाणे अग्नीचे उत्पत्ती स्थान असलेले लाकूड आपणच उत्पन्न केलेल्या अग्नीपासून जळून भस्म होते ,त्याचप्रमाणे निष्काम भावाने केलेल्या स्वधर्मपालनाने अंत :करण शुद्ध झाल्यामुळे ,पुष्कळ काळपर्यंत भगवत कथा श्रवणामुळे वाढलेल्या माझ्या तीव्र भक्ती ने ,तत्व साक्षात्कार करणाऱ्या ज्ञानाने ,प्रबळ वैराग्याने ,व्रतनियमाधींसह केलेल्या ध्यानाभ्यासाने आणि चित्ताच्या प्रगाढ एकाग्रतेने पुरुषाची प्रकृती रात्रंदिवस क्षीण होत होत हळूहळू नाहीशी होते .

भुक्तभोगा परित्यक्ता, दृष्टदोषा च नित्यशः ।

नेश्वरस्याशुभं(न्) धत्ते, स्वे महिम्नि स्थितस्य च ॥ 24॥

नंतर नेहमी दोष दिसल्याने भोगून त्यागलेली ती प्रकृती आपल्या स्वरूपात स्थित आणि स्वतंत्र असलेल्या त्या पुरुषाचे काहीही बिघडवू शकत नाही .

यथा ह्यप्रतिबुद्धस्य, प्रस्वापो बह्वनर्थभृत् ।

स एव प्रतिबुद्धस्य, न वै मोहाय कल्पते ॥ 25॥

एवं(वँ) विदिततत्त्वस्य, प्रकृतिर्मयि मानसम् ।

युञ्जतो नापकुरुत, आत्मारामस्य कर्हिचित् ॥ 26॥

ज्याप्रमाणे निद्रिस्त पुरुषाला स्वप्न कितीही अनर्थाचा अनुभव देत असले तरी जाग आल्यावर त्याला ते कोणत्याही प्रकारे मोह उत्पन्न करीत नाही .त्याचप्रमाणे ज्याला तत्त्वज्ञान झाले आहे आणि जो नेहमी माझ्या मध्येच मन लावून राहतो ,त्या आत्माराम मु नीचे प्रकृती काहीही बिघडवू शकत नाही .

यदैवमध्यात्मरतः(ख्), कालेन बहुजन्मना ।

सर्वत्र जातवैराग्य, आब्रह्मभुवनान्मुनिः ॥ 27॥

जेव्हा मनुष्य अनेक जन्मांमध्ये पुष्कळ काळपर्यंत अशाप्रकारे आत्मचिंतनातच निमग्न राहतो ,तेव्हा त्याला ब्रह्मलोकापर्यंतच्या सर्व प्रकारच्या भोगांविषयी वैराग्य निर्माण होते .

मद्भक्तः(फ्) प्रतिबुद्धार्थो, मत्प्रसादेन भूयसा ।

निः(श्)श्रेयसं(म्) स्वसं(म्)स्थानं(ङ्), कैवल्याख्यं(म्) मदाश्रयम् ॥ 28॥

प्राप्नोतीहाञ्जसा धीरः(स्), स्वदृशा छिन्नसं(म्)शयः ।

यद्गत्वा न निवर्तेत, योगी लिङ्गाद्विनिर्गमे ॥ 29॥

माझा तो धैर्यवान भक्त  माझ्याच मोठ्या कृपेने तत्त्वज्ञान आत्मसात करून आत्मा अनुभवाने सर्व संशयातून मुक्त होतो आणि पुन्हा लिंग देहाचा नाश झाल्यावर एक मात्र माझाच आश्रय असणाऱ्या आपल्या सर्व भूत कैवल्य संज्ञा असणाऱ्या माझ्या त्या मंगलमय पदाला सहजच प्राप्त करून घेतो .तेथे गेल्यानंतर योगी पुन्हा संसारात येत नाही .

यदा न योगोपचितासु चेतो,

मायासु सिद्धस्य विषज्जतेऽङ्ग ।

अनन्यहेतुष्वथ मे गतिः(स्) स्याद्-

आत्यन्तिकी यत्र न मृत्युहासः ॥ 30॥

हे माते ,जर योगाचे चित्त योग साधनेमुळे वृद्धिंगत झालेल्या आणि ज्यांच्या प्राप्तीसाठी  योगा खेरीज दुसरे साधन नाही अशा मायामय अनिमादी सिद्धींमध्ये अडकून पडले नाही ,तर त्याला माझे ते

अविनाशी पद प्राप्त होते .तेथे मृत्यूचे काही चालत नाही .

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्) सं(म्)हितायां(न्)
तृतीयस्कन्धेकपिलेयोपाख्याने सप्तविं(म्)शोऽध्यायः ॥

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥